# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २० जुलै, २०१५ / आषाढ २९, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन मंत्री** | |
| **(३)** | **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३४**

---

### डोंबिवली ते कल्याण गट नं.९ परिसरात खाडी किनारी अवैध रेती उपसा होत असल्याबाबत

**(१) * २०२९७ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली ते कल्याण गट नं.९ परिसरात खाडी किनारी अवैध रेती उपसा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध रेती उपसा करणे व साठा करण्यास शासनाच्या प्लॉटचा वापर करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत लोकप्रतिनिधी, मा.जिल्हाधिकारी यांना वारंवार पत्र देवूनही अवैध रेती उपसा थांबविण्यात येत नसल्याने शासनाच्या महसूलाचे नुकसान होत असून जमीनीचा वापर करणाऱ्यांना पाठीशी घातले जात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर व संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली आहे.
(३) व (४) लोकप्रतिनिधी यांच्याकडून जिल्हाधिकारी ठाणे यांना प्राप्त तक्रारीनुसार, संबंधित उप विभागीय अधिकारी, तहसिलदार तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना प्रस्तुत प्रकरणी कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

कल्याण तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत भरारी पथकांमार्फत वेळोवेळी फौजदारी व दंडात्मक कारवाई करुन एप्रिल, २०१३ ते जून, २०१५ या कालावधीत रुपये १,४९,१३,२०२/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच ६४ व्यक्तींविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दोडामार्ग (जि.सावंतवाडी) तालुक्यात गौण खनिज उत्खननला पूर्ण बंदी असतानाही मोठ्या प्रमाणात उत्खनन केले जात असल्याबाबत**

**(२) * २५९८२ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडामार्ग (जि.सावंतवाडी) तालुक्यामध्ये गौण खनिज उत्खननला पूर्ण बंदी असतानाही व न्यायालयाचे आदेश असताना मोठ्या प्रमाणात उत्खनन केले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) हरणबारी (ता.सटाणा, जि.नाशिक) धरणाच्या सांडव्यालगत मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन केले जात असल्याची बाब माहे मे, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) (अ) केंद्र शासनाचे तसेच मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेता सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात गौण खनिजाच्या उत्खननासाठी नवीन खाणपट्टे किंवा परवाने देण्यात आलेले नाहीत. मात्र, दोडामार्ग तालुक्यात सन २०११ मध्ये ३ खाणपट्टे ५ वर्षाच्या कालावधीसाठी मंजूर करण्यात आले असून, त्यामधून उत्खनन विहित मुदतीपर्यंतच चालू राहणार आहे.

तथापि, दोडामार्ग तालुक्यात अवैध गौणखनिज उत्खननाच्या काही घटना दृष्टोत्पत्तीस आलेल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. दोडामार्ग तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खननास आळा घालण्यासाठी दक्षता पथक स्थापन करण्यात आले आहे. सदर दक्षत पथकाने सन २०१४-१५ मध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीबाबत दंडात्मक कारवाई करुन रु.१२,९३,३७२/- इतकी रक्कम वसूल केली आहे.

(ब) सटाणा (जि.नाशिक) तालुक्यातील हरणबारी धरणाच्या सांडव्यालगत मोठ्या प्रमाणत अवैध उत्खनन केले जात असल्याचे निदर्शनास आले नाही.

तथापि, हरणबारी धरणाच्या परिसरातील ४५ ब्रास मोकळा दगड एप्रिल २०१५ मध्ये संबंधित ठेकेदाराने रितसर स्वामित्वधन भरुन मौजे हरणबारी ते हतनुर या रस्त्याच्या कामासाठी परवानगी घेऊन वापरला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वीजनिर्मिती क्षेत्रात आघाडीवर असलेल्या महानिर्मितीचे वीजसंचाचे मुदत संपल्याने होणारी वीजनिर्मिती मंदावली असल्याबाबत**

**(३) * २०१५६ श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीजनिर्मिती क्षेत्रात आघाडीवर असलेल्या महानिर्मितीच्या वीज कपंनीचे कोळशावरील ७ वीज प्रकल्पांमध्ये एकूण २९ वीजसंच असून त्यापैकी अर्ध्याहून अधिक म्हणजेच १७ संचांचे २५ वर्षाची मुदत संपली आहे, तर ११ संच तर ३० वर्षापेक्षा जास्त जुने आहे, त्यामुळे येथून होणारी वीजनिर्मिती मंदावली असून ६०-६५ टक्क्यांपर्यत आली असून, चंद्रपूर येथील वीज केंद्रातील सात संचापैकी चार संच एप्रिल २०१५ पासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य सरकारची मालकी असलेल्या महानिर्मिती या वीज कंपनीची तब्बल १ हजार १०२.९ मेगावॅट वीज निर्मिती क्षमता असून २५ वर्षाची मुदत संपल्यानंतरही हे जुने संच सुरु असल्याने वीजनिर्मिती कमी झाली असून उत्पादनाचा खर्च ही वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अर्ध्याहून अधिक वीजसंचाचे मुदत संपल्याने त्याची आधुनिकीकरण करणे आवश्यक असतानाही आजमितीस शासनाने आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टिने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील महानिर्मिती या कंपनीकडून निर्माण होणारी वीज, प्रत्यक्षात राज्यात गरज असलेली वीज यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्याने तसेच मुदत संपलेल्या जुन्या वीज संचामुळे वीजनिर्मिती कमी होत असून उत्पादन खर्चही वाढत असल्याने वीज संचाचे आधुनिकीकरण होण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आाहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महानिर्मिती कंपनीच्या १७ संचांचे आयुर्मान २५ वर्षापेक्षा जास्त व ११ संचांचे आयुर्मान ३० वर्षापेक्षा जास्त असल्याचे खरे आहे.

चंद्रपूर कैंद्रातील काही संचांमध्ये तांत्रिक बिघाड निर्माण झाल्यामुळे एप्रिल, २०१५ मध्ये सदर संच बंद होते. पंतु या संचाची दुरुस्तीची कामे अत्यंत तातडीने करुन सदर संच कार्यान्वित करुन वीज निर्मिती सुरळीत करण्यात आली.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) कैंद्रीय विद्युत प्राधिकरणाने अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये महानिर्मिती कंपनीच्या २५ वर्षापेक्षा जास्त जुन्या संचांचे कार्यक्षम नुतनीकरण व आधुनिकीकरण करण्याचे ठरविले आहे. या अनुषंगाने कोराडी संच क्र.६ च्या नुतनीकरण व आधुनिकीकरणाची कार्यवाही सुरु झाली आहे.

कोराडी संच क्र.६ चे नुतनीकरण व आधुनिकीकरण पूर्ण झाल्यानंतर व सदर संचाच्या कामगिरीच्या अहवालाची पडताळणी केल्यानंतर इतर संचांचे आधुनिकीकरण व नुतनीकरण करण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पुणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि वाहतूक पोलीस यांच्या संयुक्त तपासणीत सुमारे साडे आठ हजार कॅब चालकांकडे ओळखपत्र नसल्याबाबत

**(४) * १७६०८ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि वाहतूक पोलीस यांच्या संयुक्त तपासणीत कॅब चालकांचे परवाने, कागदपत्रे, ओळखपत्रे तपासण्यात आली आहे, या

तपासणीमध्ये सुमारे साडे आठ हजार कॅब चालकांकडे ओळखपत्रच नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ओळखपत्र नसलेल्या कॅब चालकांवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील वायुवेग पथकाद्वारे ऑक्टोबर-२०१४ ते डिसेंबर, २०१४ या कालावधीत ९५० वाहने तपासण्यात आली. त्यापैकी कॅब चालकाकडे ओळखपत्र नसल्याचे दोषी आढळलेल्या १६६ वाहनांच्या चालकांकडून दंड वसूली करण्यात आली.

त्याचप्रमाणे पोलीस विभाग व प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी रेडीओ कॅब कंपन्यांच्या प्रतिनिधींसमवेत दि. ०९ डिसेंबर, २०१४ रोजी घेतलेल्या संयुक्त बैठकीत, कॅब चालकांनी पोलीस व्हेरिफिकेशन करुन घेऊन प्रादेशिक परिवहन कार्यालयातून त्वरीत ओळखपत्र प्राप्त करून घ्यावीत, अशा सूचना रेडिओ कॅबच्या प्रतिनिधींना देण्यात आल्या.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालवण व कणकवली (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील खाडीपात्रात तसेच रावेर व मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील नदी/नाल्यातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(५) * १७३७५ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण व कणकवली तालुक्यात तहसिलच्या पथकाने हडी-कालावल खाडीपात्रात धडक कारवाई करून वाळू उत्खननासाठी वापरण्यात येणाऱ्या ४७ होड्या ताब्यात घेतल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच जळगाव जिल्ह्यातील रावेर व मुक्ताईनगर तालुक्यातील मध्यप्रदेशाच्या सीमेला लागून असलेल्या नदी नाल्यातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू मध्यप्रदेशात वाहून नेली जात असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) वाळूचे अवैध उत्खनन रोखण्याकरिता महसूल विभाग, बंदरे विभाग, मत्स्य व्यवसाय विभाग व पोलीस विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांनी एप्रिल २०१५ मध्ये संयुक्त कारवाई करुन मालवण तालुक्यातील मौजे कालावल व कर्ली खाडीतील अनधिकृत वाळू उत्खनन करणा-या एकूण ३० होड्या सिल केल्या आहेत. तसेच कुडाळ तहसिल कार्यालयाने एप्रिल, २०१५ मध्ये कर्ली खाडीमध्ये अवैध उत्खनन करणा-या ४८ होड्या सिल केल्या आहेत.

जळगाव जिल्ह्यातील रावेर व मुक्ताईनगर तालुक्यातील मध्यप्रदेशच्या सीमेला लागून असलेल्या नदी/नाल्यातून अवैध वाळू मध्य प्रदेशात वाहून नेल्याची बाब मे २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास आढळून आली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### सोलापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यात सन २०१५ मध्ये झालेल्या पावसामुळे व गारपीटीमुळे शेतपिकांचे व घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत

**(६) * १६६७८ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यात सन २०१५ मध्ये झालेल्या पावसामुळे व गारपीटीमुळे शेतपिकांचे व घरांचे मोठ्या प्रमाणात तसेच गहु, ज्वारी, हरभरा, करडई पिकांबरोबरच द्राक्ष, आंबा आदि फळबागा जमीनदोस्त झाल्या असल्याने नुकसान होऊनही या नुकसानाचा अद्यापी पंचनामा करण्यात आला नसून, शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळाली नसल्याचे माहे मार्च-एप्रिल, मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवेळी येणाऱ्या पावसामुळे शेतीचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असुन गारपिटीमुळे शेळ्या, मेंढ्या व इतर जनावरे दगावली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, डोंगरगाव (जि.सोलापूर,ता.सांगोले) येथील श्री.संजय उतळे यांचा वीज पडून मृत्यु झाला असून  कटफळ खवासपूर येथील वादळी वाऱ्याने  ४५ पेक्षा जास्त घरांची पत्रे उडून भिंती पडून नासधूस झाली व ६ व्यक्ती जखमी व एक जर्सी गाय मरण पावली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, झालेल्या नुकसानाचे पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना तसेच आपदग्रस्तांना तातडीने आर्थिक नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) सन २०१५ मध्ये झालेल्या अवेळी पावसामुळे पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात २६६.०९ हेक्टर, पुणे जिल्ह्यात ७५५८.०९ हेक्टर, सातारा जिल्ह्यात ३१९४.१७ हेक्टर, सांगली जिल्ह्यात ४१५०.८८ हेक्टर व कोल्हापूर जिल्ह्यात २५.४७ हेक्टर असे एकूण १५१९४.७० हेक्टर क्षेत्रातील शेतीपिके व फळपिकांचे नुकसान झाले आहे.

तसेच पश्चिम महाराष्ट्रात एकूण २२ मोठी व ३२ लहान जनावरे दगावली असून, १ व्यक्तीचा वीज पडून मृत्यू झाला आहे व एकूण ६६१ घरांची अंशत: पडझड झाली आहे.

नुकसानीबाबत पंचनामे करण्यात आले असून, शेती व फळपिकांच्या नुकसानीसाठी मदत वाटपाची कार्यवाही सुरु आहे. मृत जनावरांच्या पात्र मालकांना मदत वाटप करण्यात आली असून उर्वरित १ जनावराचे बाबतीत मदत वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे. पडझड झालेल्या घरांचे पंचनामे करण्यात आले असून, घटनेच्या दिवशी ६५ मि.मी. पेक्षा कमी पावसाची नोंद झाली असल्याने मदत देय नाही.

(३) होय.
(४) मृत व्यक्तींच्या वारसाला तसेच मृत जनावरांच्या पात्र मालकांना शासन निकषानुसार मदत वाटप करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सावदा (जि.जळगाव) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या उपविभागातून शेतकऱ्यांच्या शेतातील मीटर नादुरुस्त दाखवून जादाची विद्युत देयके महावितरण कंपनी कडून देण्यात येत असल्याबाबत**

**(७) * २१५२८ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावदा (जि.जळगाव) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या उपविभागातून शेतकऱ्यांच्या शेतातील मीटर नादुरुस्त दाखवून जादाची विद्युत देयके महावितरण कंपनी कडून देण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जादाची विद्युत देयके देणा-या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच जादाची विद्युत देयके कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. सावदा उपविभागांतर्गत कृषी ग्राहकांच्या मार्च २०१५ च्या त्रैमासिक विद्युत देयकांमध्ये एकूण १९११ ग्राहकांचे मीटर नादुरुस्त असल्याने त्यांना सरासरी वीज वापराची देयके देण्यात आली होती. सदर नादुरुस्त मिटर असलेल्या ग्राहकांना जादा वापराची देयके देण्यात आलेली नाहीत. तसेच विद्युत देयकाबाबत तक्रारी असणाऱ्या एकूण ५३ वीज ग्राहकांची देयके प्रत्यक्ष स्थळ तपासणी केल्यानंतर दुरुस्त करुन देण्यात आलेली आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**घाटंजी तालुक्यातील एकूण सात नवीन उपकेंद्रास प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना उपकेंद्राची कामे निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(८) * २५२६२ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी तालुक्यातील एकूण सात नवीन उपकेंद्रास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सात उपकेंद्राची कामे निधी अभावी प्रशासकीय स्तरावर प्रलंबित असल्याबाबत मा.ऊर्जा मंत्र्यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे. घाटंजी तालुक्यामध्ये तीन नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्रास (राजुरवाडी, मुरली, शिरोली) प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

(२) होय.

(३) शिरोळी उपकेंद्राचे काम पूर्ण झाले असून इतर दोन उपकेंद्राची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गव्हाणकुंड भेमडी, (ता.वरुड, जि.अमरावती), जावरा (ता.तिवसा, जि.अमरावती) खडकपूर्णा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) व मौजे उमरखेड (जि.यवतमाळ) येथील नदीपात्रातून अवैध उत्खनन होत असल्याबाबत**

**(९) * १६९७८ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गव्हाणकुंड, भेमडी (ता.वरुड, जि.अमरावती) परिसरातून मूरूमाचे मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन होत असून या मुरुमाची बाजारात खुलेआम चढ्या दराने विक्री होत असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, जावरा (ता.तिवसा, जि.अमरावती) रेतीघाटाचा अद्याप लिलाव झाला नसला तरी या रेती घाटातून मोठ्या प्रमाणात वाळूची चोरी वाळू तस्कर करीत असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) सिंदखेड राजा तालुक्यातील (जि.बुलढाणा) खडकपूर्णा नदीपात्रातून अवैध रेतीचे मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरु आहे, हे खरे आहे काय,

(४) मौजे उमरखेड (जि.यवमताळ) येथील पैनगंगा नदीच्या चालगणी घाटातून ट्रेझर बोटच्या सहाय्याने कुठलीही परवानगी नसतांना रेतीचे अवैध उत्खनन होत आहे, हे खरे आहे काय,

(५) गोंडपिंपरी तालुक्यातील (जि.चंद्रपूर) धानोरा येथील वर्धा नदीच्या पात्रातुन बेकायदेशीररीत्या रेती उपसा होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ पासुन सतत निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(७) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४), (५), (६) व (७) (अ) अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यातील गव्हाणकुंड व भेमडी परिसरातुन मुरुमाचे तसेच तिवसा तालुक्यातील जावरा येथील रेतीघाटातून रेतीचे मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(ब) सिंदखेड राजा तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत.

सदर तालुक्यात एप्रिल २०१५ ते जून २०१५ या कालावधीत वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ३७ प्रकरणामध्ये रुपये ३,०२,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला असून, ८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(क) उमरखेड तालुक्यातील चालगणी या वाळूगटाचा रितसर लिलाव झाला असुन, सदर वाळूगटातून ट्रेझर बोटद्वारे उत्खनन होत असल्याचे आढळून आले नाही.

मात्र सदर वाळूगटाच्या विरुध्द बाजूस हदगाव तालुक्यातील (जि.नांदेड) गुरफळी वाळूगटातून विनापरवानगी ट्रेझर बोटच्या सहाय्याने रेती उत्खनन झाल्याचे

निदर्शनास आल्यावरुन तहसिलदार हदगाव यांनी संबंधितांविरुध्द दंडात्मक कारवाई केली आहे.

(ड) मौजे धारोरा हे गांव राजूरा तालुक्यात असुन, येथील वर्धा नदीपात्रात रेती नसल्याने त्या ठिकाणी कोणतेही अवैध उत्खनन झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक (जि.नाशिक) येथील तहसीलदार कार्यालयाने नजराणा फी मध्ये २५ कोटीचा अपहार केला असल्याबाबत**

**(१०) * १९१८५ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इनामी वतन तसेच कुळ कायद्यानुसार कसणा-याच्या नावे जमिन करतांना शासनाने नजराणा रक्कमेचे नियम निश्चित केलेले असतांना माहे एप्रिल, २००८ ते २०१२ या कालावधीत नाशिक (जि.नाशिक) तहसीलदार कार्यालयाने नजराणा फी मध्ये २५ कोटीचा अपहार केला असल्याची बाब माहे मे, २०१३ च्या दरम्यान लेखापरिक्षणात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषगाने संबंधित दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) प्रश्नाधीन प्रकरणी अपहार झाल्याचे निदर्शनास अले नसून वर्ष २००८, २०१० व २०११ मध्ये नाशिक तालुक्याच्या तहसिलदार कार्यालयाने वतन/इनाम किंवा भोगवटदार वर्ग-२ च्या नवीन शर्तीच्या शेतजमिनींच्या अकृषिक वापरासाठी रुपांतरणास परवापनगी देतांना २५ प्रकरणांत सुमारे रुपये ९.१८ कोटी इतकी नजराणा रक्कम कमी वसूल केल्याचे माहलेखापाल यांच्या लेखापरिक्षण अहवालात निरिक्षण नोंदविलेले आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अंतर्गत लेखापरिक्षण पथकामार्फत प्रकरणनिहाय छाननी करुन सदर प्रकरणी शासनाचा दि.०२/०८/२००८ चा शासन निर्णय व १५/०७/२०१३ च्या पत्रातील मार्गदर्शनाप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्याचे स्पष्ट करुन सदर लेखा आक्षेप वगळण्यास जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महालेखापालांना विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोल्यातील गती ऑटोडिलने मुंबई, वाशी येथील स्टार मोटारकडून खरेदी केलेल्या टिप्परचे नाहरकत बनावट असल्याबाबत**

**(११) * १७३०६ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोल्यातील गती ऑटोडिलने मुंबई, वाशी येथील स्टार मोटारकडून पाच लाख रुपयाचे टीप्पर खरेदी केले असून सदर टीप्परचे नाहरकत प्रमाणपत्र बनावट असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांशी वाहन विक्री करतांना विक्रेत्यांकडून परिवहन कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व एंजट यांना हाताशी धरून विविध प्रकारची बनावट कागदपत्रे तयार केली जात असून बनावट कागदपत्रे तयार करणारी टोळी सक्रीय असूनही याबाबत संबंधितांवर कारवाई करण्यात येत नसल्याने ग्राहकांची फसवणूक होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बनावट कागदपत्रे तयार करणा-या टोळीवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे. सदरच्या बनावट ना-हरकत प्रमाणपत्रासंदर्भात पोलिस स्टेशन, खदान, अकोला यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक विभागातील इंफ्रा-२ च्या कामात झालेल्या सुमारे ८५० कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराबाबत**

**(१२) * २२७०१ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागातील इंफ्रा-२ च्या कामात झालेल्या सुमारे ८५० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याची गंभीर बाब माहे जून, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी असणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही. पायाभूत आराखडा-२ अंतर्गत नाशिक परिमंडळातील नाशिक जिल्ह्यासाठी रु.३४५.१५ कोटीच्या ५ निविदा कंत्राटदारास प्रदान करण्यात आलेल्या असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच नाशिक ग्रामीण विभागासाठी काढण्यात आलेल्या निविदांना योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे रु.८३.९४ कोटीची कामे उपविभागावर विभागून निविदा परिमंडळ स्थरावर काढण्याचे आदेशीत केले आहे. नाशिक विभागात पायाभूत आराखडा-२ च्या कामामध्ये रु.८५० कोटीचा भ्रष्टाचार झाला अशी कुठलीही बाब महावितरणच्या निदर्शनास आली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोणगांव (ता.मुदखेड, जि.नांदेड) येथील आदिवासी शेतकरी व त्यांच्या कुटुंबियांच्या नावे ठिबक सिंचन योजनेचे बनावट प्रस्ताव तयार केल्याबाबत

**(१३) * १६९४८ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोणगांव (ता.मुदखेड, जि.नांदेड) येथील आदिवासी शेतकरी बालाजी हामंद यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नांवे बनावट दस्तावेज तयार करून ठिबक सिंचन कंपन्यांनी सुमारे १२ लाख ९६ हजार रूपये परस्पर बळकावल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या व त्याच्या कुटुंबियांच्या नावे ठिबक सिंचन योजनेचे खोटे प्रस्ताव तयार करुन सन २००६ ते २०१२ या आर्थिक वर्षात १२ लाख ९६ हजार रुपयांची रक्कम ठिबक सिंचन कंपन्यानी परस्पर घेतली आहे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती संबंधित दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) श्री.बालाजी गणपत हामंद यांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांचेकडे केलेल्या दिनांक १२ मे, २०१५ रोजीच्या लेखी निवेदनास अनुसरुन उपविभागीय कृषी अधिकारी, नांदेड व तालुका कृषि अधिकारी, मुदखेड यांनी सन २००६-२०१२ या कालावधीत श्री.बालाजी हामंद व त्यांचे कुटुंबियांच्या शेतावर देयकाप्रमाणे बसविलेले ठिबक साहित्य, एकूण क्षेत्र व देण्यात आलेले अनुदान या बाबतची माहिती त्यांना दिली. श्री.हामंद यांचे सदर माहितीने समाधान झाले व त्यांनी याप्रकरणी कुठलीही तक्रार नाही, असे लिहून दिले.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रिक्षा-टॅक्सी यांची दरवाढ झाल्यानंतर रिक्षा-टॅक्सीच्या मीटरची पुर्नगठन प्रक्रिया सदोष असल्याबाबत**

**(१४) * १७०६८ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेशातील रिक्षा-टॅक्सी यांची दरवाढ झाल्यानंतर रिक्षा-टॅक्सीच्या मीटरची पुर्नगठन प्रक्रिया अत्यंत घाईघाईने करण्यात आल्याने, पुर्नगठन झालेले मीटर बसविलेल्या गाड्या रस्ते चाचणीसाठी आल्यानंतर रस्ते चाचणीच्यावेळी अनेक गैरप्रकार झाले, काही प्रादेशिक परिवहन विभागाकडे चाचणीच्या ठिकाणी परिवहन कार्यालयातील अधिकारी उपस्थित नव्हते, अशी तक्रार मा.परिवहन मंत्री यांच्याकडे माहे मे, २०१५ च्या दरम्यान ग्राहक पंचायतीने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मीटर पुर्नगठनच्या त्रुटीमुळे ग्राहकांची फसवणूक होत असून जादा दराने रिक्षा व टॅक्सीचे भाडे द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणा-या परिवहन अधिका-यांवर कोणती कारवाई करण्याबाबत तसेच दरवाढ करताना मिटर पुर्नगठन करताना झालेल्या चुकीची पुनरावृत्ती होऊ नये व ग्राहकांची लूट थांबविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**मुंबई शहरातील वांद्रे रेल्वे स्थानकानजीक पश्चिमेला असलेल्या शास्त्रीनगर झोपडपट्टी मध्ये भीषण आग लागल्याबाबत**

**(१५) * १९६६० श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वांद्रे रेल्वे स्थानकानजीक पश्चिमेला असलेल्या शास्त्रीनगर झोपडपट्टीत दिनांक २४ एप्रिल, २०१५ रोजी भीषण आग लागून आगीमध्ये लाखोंची वित्तहानी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आगीत नुकसान झालेल्या नागरिकांना कोणत्या प्रकारची शासनामार्फत मदत देण्यात आली,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय. दिनांक २५.४.२०१५ रोजी आग लागून सदर आगीत २९ झोपड्या पूर्णत: व १३ झोपड्या अंशत: जळालेल्या आहेत.

(२) होय. सदर आगीची घटना सदोष विद्युत प्रणालीमुळे घडल्याची शक्यता आहे. केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्तीच्या निकषानुसार सदर घटनेसाठी मदत अनुज्ञेय नाही. आपदग्रस्तांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत देण्याची बाब विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील गोधनी शिवारातील गौण खनिजांच्या गैरप्रकाराबाबत**

**(१६) * २४५६७ श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील गोधनी शिवारात शेतातून व ई-वर्ग जमिनीवरुन कुठलीही परवानगी न घेता गेल्या दहा वर्षापासून गौण खनिजांची अवैध उत्खनन करुन शासनाचा कोटयवधी रुपयांचा महसूल बुडविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गौण खनिजाच्या चोरी रोखण्याकरीता तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी दंड आकारले असून मात्र पटवारी व मंडळ अधिकारी यांच्या दुर्लक्षतेमुळे जिल्हा प्रशासनाला यश आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष डॉ.एस.एम.मिश्रा यांनी लोकशाही दिनात तक्रार करुन पाच ते सात कोटींच्या गौण खनिजांची चोरी झाल्याचे निदर्शनास आणले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली, आहे काय चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) यवतमाळ जिल्ह्यातील मौजे गोधनी क्षेत्रात तसेच सर्व्हे क्रमांक ३१/५ मध्ये अवैध उत्खनन झाल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

(२) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीवर आळा घालण्यासाठी तालुकास्तरावर गठीत करण्यात आलेल्या भरारी पथकांनी मागील दहा वर्षात मौजे गोधणी क्षेत्रात एकूण ७८ प्रकरणांत रुपये २,५१,८००/- एवढा दंड वसूल केलेला आहे.

(३) व (४) श्री.एस.आर.मिश्रा यांनी लोकशाही दिनात दि. २.२.२०१५ रोजी जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडे यासंदर्भात निवेदन दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली असता मौज गोधनी येथील तीन मंजूर खनिपट्ट्यांची मुदत संपल्यामुळे क्रशर विनापरवाना सुरु राहू नये म्हणून खनिपट्टा धारकांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

मौजे गोधणी येथील शासकीय क्षेत्रात गौण खनिजाचे अवैध उत्खनन करण्याच्या संदर्भात उपसंचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, चंद्रपूर यांचेमार्फत मोजणी करण्यात आली आहे. त्यानुसार अधिक उत्खनन केलेल्या गौणखनिजाच्या स्वामित्वधनापोटी संबंधित खनिपट्टाधारकांकडून रु.६,५०,५४०/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. त्याप्रमाणे डॉ.एस.आर.मिश्रा यांना दि.२८.४.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पोशीर व चिकनपाडा (ता.खालापूर, जि.रायगड) गावातील विहीरीत विषारी औषध टाकल्याने मासे मृत्यूमुखी पडल्याबाबत**

**(१७) * २१०२० श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोशीर आणि चिकनपाडा (ता.खालापूर, जि.रायगड) गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या पोशीर नदीवरील जॅकवेल मध्ये अज्ञात इसमांनी विषारी औषध टाकल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहीरीत विषारी औषधे टाकल्यामुळे विहीरीतील मासे मृत्यूमुखी पडले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे. तथापि सदरची गांवे खालापूर तालुक्यात नसून कर्जत तालुक्यातील आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत पोलीस स्टेशन कळंब येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**राज्य परिवहन महामंडळाच्या धुळे विभागातील ३० चालकांना रंग व रातअंधळेपणाचे खोटे दाखले दिल्याबाबत**

**(१८) * २३१५४ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे विभागातील राज्य परिवहन महामंडळाच्या ३० चालकांनी सन २०११ ते २०१४ या कालावधीमध्ये रंग व रातअंधळेपणाचे खोटे दाखले दिल्यामुळे त्यांना सुरक्षा रक्षक या पदावर तत्कालीन विभाग नियंत्रकांनी पर्यायी नियुक्त्या दिलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती रंग व रातअंधळेपणाचे खोटे दाखले देणा-या ३० चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) जिल्हा शल्य चिकित्सक, धुळे यांनी ३० रा.प.चालकांना वैद्यकिय तपासणीत रंगअंधत्वामुळे चालक पदी अपात्र ठरविल्याने ३० चालकांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या दि.२१.७.२०१२ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार सुरक्षा रक्षक या पदी पर्यायी नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाने, दिनांक २४.१०.२०१३ अन्वये दिलेल्या ओदशानुसार खात्यांतर्गत सखोल चौकशी केलेली आहे. चौकशी अहवाल दिनांक ३१.७.२०१४ अन्वये वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प.नाशिक यांनी चौकशीअंती जबाबदारी निश्चित करुन सविस्तर अहवाल सादर केला आहे.

अधिष्ठता, वैद्यकिय मंडळ, भाऊसाहेब हिरे, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, धुळे यांनी ३० रा.प. चालकांपैकी एका चालकास चालक पदी अपात्र ठरविल्यामुळे सदर प्रकरणी संबंधीत चालक दोषी नसल्याने त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात आली नाही.

सदर प्रकरणी जबाबदार अधिकारी व २९ चालक यांना आरोपपत्र देण्यात आले असुन खातेनिहाय पुढील कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**येलदरी कॅम्प (ता.जितूर, जि.परभणी) अंतर्गत गजानन शिक्षण प्रसारक मंडळ व महाविद्यालयांनी बनावट कागदपत्रे दाखल करुन अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त केल्याबाबत**

**(१९) * २४५४७ श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येलदरी कॅम्प (ता.जिंतूर, जि.परभणी) अंतर्गत गजानन शिक्षण प्रसारक मंडळ तोष्णीवाल, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव (जि.हिंगोली) महाविद्यालयाने बनावट कागदपत्रे दाखल करुन मारवाडी (भाषिक) अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त केल्याबाबतच्या तक्रारी माहे फेब्रवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा. अल्पसंख्यांक मंत्री याचेकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार संबंधित संस्थेविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर संस्थेने भाषिक (मारवाडी) अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावासोबतच्या सर्व कागदपत्रांची पुन्हा तपासणी केली असता. संस्थेने सादर केलेले दस्तावेज बरोवर असल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील रस्ते अपघातांचे फौजदारी प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(२०) * २४३०० श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रस्ते अपघाताचे तब्बल २१,३४९ फौजदारी प्रकरणे अपघात न्यायालयात प्रलंबित असून त्यानुसार एकट्या मुंबईत सर्वाधिक म्हणजे तब्बल २,८९५ प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोटार वाहन सुरक्षा कायद्यानुसार अपघातानंतर ९० दिवसांत प्रकरणाचा निकाल लागणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(३) एवढया मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, असल्यास, सदरहू प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) राज्यात दिनांक ३१.०५.२०१५ पर्यंत एकूण ८२,४७५ दावे प्रलंबित असून, मुंबईत १०,३४१ इतके दावे प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही, तथापि, महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ नियम क्र.२५५(३) नुसार सेक्शन १४० चा अर्ज ४५ दिवसाच्या आत न्यायधिकरणाने निकाली काढण्याचा प्रयत्न करावा, असे कायद्यात नमुद आहे.

(३) व (४) सदर प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.
(अ) दावेदारांकडून किंवा त्यांच्या वकिलांकडून सादर होणा-या दाव्यामध्ये जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र, शवविच्छेदन प्रमाणपत्र वेळेत दाखल होत नाहीत.
(ब) काही दाव्यामध्ये प्रतिवादी हे इतर राज्यातील असल्यामुळे त्यांना लवकर नोटिसा बजावून होत नाहीत. तसेच काही दाव्यामध्ये विमा पॉलिसी आढळून येत नाही, तर काही दाव्यामध्ये साक्षिदार हजर न केल्यामुळे दावे प्रलंबित राहतात.
(क) राज्यात एकूण १४ मोटार अपघात दावा न्यायाधिकरणे आहेत (मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर) तसेच इतर जिल्हयाच्या ठिकाणी सदर दावे हे जिल्हा नयायलायात चालविले जातात. त्या ठिकाणी इतर प्ररणे असल्यामुळे मोटार अपघाताखालील प्रकरणे प्रलंबित राहतात.
(ड) मोटार अपघात दावा न्यायाधिकरणातील जास्तीत जासत प्रकरणे मा.उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार लोक न्यायालयात ठेवून निकाली काढण्यात येत आहेत. तसेच मध्यस्थी केंद्राकडे आपसी तडजोडीकरिता दावे ठेवण्यात येतात.

-----------------

## भिंवडी वसई मार्गावरील मालोडी व पायगाव या ठिकाणी बेकायदेशीर इमारतींवर भिवंडी तहसिल कार्यालयाने कारवाई केल्याबाबत

**(२१) * २०७१२ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिंवडी वसई मार्गावरील मालोडी व पायगाव या ठिकाणी बांधकाम व्यावसायिकाने बेकायदेशीर रहिवाशी इमारत बांधल्याप्रकरणी भिवंडी उपविभागीय प्रांत अधिकारी व भिवंडी तहसिल कार्यालयामार्फत ६ इमारती अर्धवट स्थितीत तोडण्यात आल्यानंतरही त्या इमारती पुन्हा उभारण्यात आल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बांधकाम व्यावसायिकांना संबंधित अधिकारी पाठीशी घालत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) भिंवडी तालुक्यातील मौजे पायगाव येथील स.नं. २९८/८ व इतर व मौजे खारबाव (ग्रामपंचायत मालोडी क्षेत्र) येथील स.नं. १३४/२ पै व इतर या मिळकतीवरील मालक/विकासक यांनी विकसित केलेल्या अनधिकृत इमारती

निष्कासित करण्याची कारवाई दि.१६/०४/२०१५ व दि.१७/०४/२०१५ रोजी उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तद्नंतर सदर जमिनीच्या काही भागावर विकासकाने पुन्हा बांधकाम सुरु केल्याचे निदर्शनास आल्याने दि.२०/०४/२०१५ रोजी तलाठी, खारबाव यांनी सुरु असलेले अनधिकृत बांधकाम पंचासमक्ष बंद केले.

(२), (३) व (४) सदर कारवाईविरुध्द संबंधित विकासक यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केल्या असून सदर याचिकांत मा.उच्च न्यायालयाने दि. २५/०५/२०१५ रोजी "जैसे थे" आदेश पारीत केले आहेत. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**चिपळून तालुक्यातील (जि.रत्नागिरी) पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागामार्फत कुक्कुटपालन योजनेतंर्गत कोंबड्याचे वाटप ठराविक गावांमध्ये केल्याबाबत**

**(२२) * १९६२४ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळून तालुक्यातील (जि.रत्नागिरी) पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागामार्फत कुक्कुटपालन योजनेतंर्गत कोंबड्याचे वाटप करताना पशुसंवर्धन अधिका-यांनी मनमानी करुन तालुक्यातील ठराविक गावांमध्येच कोंबड्या वाटप केल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही गावांमध्ये शेतक-यांच्या नावाने कोंबडयाचे वाटप केले दाखवून त्या बाजारात परस्पर विकल्याचा आरोप पंचायत समिती सदस्य यांनी केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) बाबत प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कासार्डे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) ग्रामस्थांना येथील खाण व्यवसायामुळे विविध समस्या उद्‌भवत असल्याबाबत**

**(२३) * २०३२७ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेली अनेक वर्षे कासार्डे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामस्थांना खाण व्यवसायामुळे नादुरुस्त रस्ते, दुषित गढूळ पाणी, ब्लास्टिंगमुळे घरांना तडे जाणे व धुळीचे प्रादुर्भाव अशा विविध समस्यांना तोड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास कासार्डे येथील सिलीका मायनिंगसाठी मोठ्या प्रमाणात भूसुंरुग स्फोट केले जात असून त्यानंतर गढूळ होऊन दुषित पाणी नदीनाल्यात सोडले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू सिलीका मायनिंग विरोधात ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, मा.महसूल मंत्री, मा.पालकमंत्री आदींकडे मागील ३ वर्षापासून सातत्याने तक्रारी केल्या असून तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीनीही दिनांक १ डिसेंबर, २०१४ रोजी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) आल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू सिलीका मायनिंगमुळे कासार्डे ग्रामस्थांना सोसाव्यालागणा-या विविध समस्यांचे विनाविलंब निराकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) कणकवली तालुक्यात कासार्डे येथील सिलिका उत्खननासाठी चालू खाणकामामुळे नागरिकांना त्रास होत असल्याविषयी स्थानिक लोकप्रतिनिधींनी, दि.१.१२.२०१४ रोजी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे लेखी तक्रारी केली होती हे खरे आहे.

सदर तक्रार प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निदेशावरुन चौकशी करण्यात येऊन, त्याबाबतचा अहवाल स्थानिक लोकप्रतिनिधी यांना दि.२३.४.२०१५ च्या पत्रान्वये पाठविला आहे.

सदर चौकशीत मौजे कासार्डे येथील दोन मंजूर सिलीका खाणपट्टांतर्गत सुरु खाणकामामुळे मौजे कासार्डे येथील दाबवाडी, देवूळकरवाडी येथे कोणत्याही प्रकारचे साथीचे रोग उद्भवले असल्याचे, सिलिका वॉशिंगचे पाणी नदीपात्रात सोडण्यात येत असल्याचे व नदीपात्रातील पाण्याच्या प्रदुषणामुळे जनावरे व माणसांना त्रास होत असल्याचे आढळून आले नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.औरंगाबाद) या तालुक्यात गोदावरी नदीतून तसेच सोलापूर जिल्ह्यात अनधिकृतपणे शासकीय जमीनींवरील मुरुम, माती, दगड यांचे मोठ्या प्रमाणात उपसा होत असल्याबाबत

**(२४) * १७१४८ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) या तालुक्यात गोदावरी नदीतून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्यामुळे परिसरातील गावांना पुराचा धोका निर्माण झाला असून शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) सोलापूर जिल्ह्यातील एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत अनधिकृतपणे शासकीय जमीनींवरील मुरुम, माती, दगड वाळूचोरी करुन विकणा-या ७४४ वाहनांवर महसूल प्रशासनाने कारवाई करीत ३ कोटी ८२ लाख ६२ हजारांचा दंड वसूल केला असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व वाळू तस्कर यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यात गोदावरी नदीतून अवैध वाळू उपश्याची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहे ही वस्तुस्थिती आहे. अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी दक्षता पथक स्थापन करण्यात आले असून, सन २०१४-१५ मध्ये वैजापूर तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या १०६ प्रकरणांत रु.२२,६५,३६४/- इतका दंड वसूल करण्यात आला असून, ५८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच सन २०१५-१६ मध्ये १६ प्रकरणात रु.५,६४,६००/- इतका दंड वसूल करण्यात आला असून, ४ गुन्हे दाखल करण्यात आले

आहेत. मात्र अवैध उत्खननामुळे गोदावरी नदी परिसरातील गावांना पुराचा धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

सोलापूर जिल्ह्यात एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत गौण खनिजाची अवैध वाहतूक करणा-या ७४४ वाहनांवर कारवाई करुन रु.३,८२,६२,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बिबवेवाडी, पुणे येथील गंगाधाम सोसायटीलगतच्या टेकडी फोडण्याचे काम सुटीच्या दिवशीही रात्रंदिवस सुरु असल्याबाबत**

**(२५) * २५४७८ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिबवेवाडी, पुणे येथील गंगाधाम सोसायटीलगतच्या टेकडी फोडण्याचे काम सुटीच्या दिवशीही रात्रंदिवस सुरु असल्याची बाब माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिलटॉप आरक्षित जागांवर मोठमोठी मंगल कार्यालये व इतर उद्योग सुरु झाले तरी टेकड्या तोडणाऱ्यांवर सहाय्यक महापालिका आयुक्त किंवा तहसीलदार यांच्याकडून कोणतीही कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) तहसिलदार पुणे शहर यांनी बिबबेवाडी पुणे येथील “हिलटॉप-हिलस्लोप” या ठिकाणी अनधिकृत टेकडीफोड करणा-यांविरुध्द दंडात्मक कारवाई करुन रुपये ८,६२,२७०/- इतकी रक्कम वसूल केली अहे.

पुणे महानगरपालिकेने जानेवारी, २०१३ पासून अनधिकृत बांधकामांविरुध्द ७४ नोटीसा देऊन, ८२,९५० चौ.फु. बांधकामचे निष्कासन केले आहे. तसेच टेकडी फोड करणारे जेसीबी जप्त करुन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बुलढाणा जिल्हयातील गुंजाळा शिवारात अकोल ते औरंगाबाद, ७३५ के.व्ही. डबल सर्किट ट्रान्समिशन लाईनचे काम सुरु असल्याबाबत**

**(२६) * २२९७२ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील गुंजाळा शिवारात अकोल ते औरंगाबाद, ७३५ के.व्ही. डबल सर्किट ट्रान्समिशन लाईनचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरात ठिकठिकाणी टावर उभारणीचे व तार ओढण्याचे काम चालू असून त्याठिकाणी असलेल्या आंबा, बेहडा, जांभुळ आदि फळझाडांसह निंब, बाभुळ आदि विविध जातीच्या व मोठमोठ्या झाडांची सर्रास कत्तल करण्यात येत असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर झाडांची कत्तल करण्याकरिता महसूल वन विभागाची कोणतीही पूर्व परवानगी न घेता व शेतक-यांची फसवणूक करुन टावर कंपनीच्या अधिकारी व कामगारांकडून वृक्ष तोड सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने यास जबाबदार असणा-या टावर कंपनीच्या अधिकारी व कामगारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे माळेगांव (ता.त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक) शिवारातील २८ शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेल्या जमीनींचे मुळ दस्तऐवज गहाळ झाल्याबाबत**

**(२७) * १८२६४ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माळेगांव (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) शिवारातील २८ शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेल्या १०० एकर जमीनीचे मुळ दस्तऐवज गहाळ झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी राज्य माहिती आयोगाने संबंधीतांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा आदेश देवूनही गुन्हा दाखल करण्यासाठी टाळाटाळ करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) मौजे माळेगाव ता.त्रंबकेश्वर जिल्हा नाशिक शिवारातील २८ शेतक-यांना वाटप करण्यात आलेल्या १०० एकर जमीनीचे मुळ दस्तऐवज/आदेश तत्कालिन तहसिल कार्यालय नाशिक यांचे अभिलेख कक्षात तसेच संबंधित गावचे दफ्तरात कसुन शोध घेण्यात येवुनही आढळून आलेले नाहीत.

या प्रकरणी राज्य माहिती आयोगाने त्यांचे आदेश दिनांक १२/९/२०१४ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे अदेश दिल्याप्रमाणे संबंधित तत्कालिन तलाठी यांचे विरुध्द दिनांक २२/६/२०१५ रोजी फौजदारी गुन्हा नोंदविण्यात अलेला असून सदर प्रकरणाचा पोलीस तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बिलोली (जि.नांदेड) तालुक्यात मांजरा नदीपात्रातील व पंढरपूर तालुक्यातील भीमानदी पात्रातून वाळूची तस्करी होत असल्याबाबत**

**(२८) * १७१०२ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (चांदूर रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली (जि.नांदेड) तालुक्यात मांजरा नदीपात्रातील येसगी, कार्ला, बोळेगाव येथून वर्षभर रात्रीच्या वेळी वाळूची तस्करी होत असून याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पंढरपूर तालुक्यातील आंबे येथील भीमानदी पात्रातून वाळू उपसा चालू असून ट्रक मध्ये क्षमतेपेक्षा जास्त वाळू भरुन वाहतूक होत असल्याने या भागातील रस्त्याची दुरवस्था झाली असून याबाबत राझंणी, अनवली येथील रहिवाशांनी

संबंधितांकडे तक्रार करुनही प्रशासनाने दुर्लक्ष केले असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले अहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व वाळू तस्कर यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पतीस आली आहेत. ही वस्तुस्थिती आहे.

(२) पंढरपूर तालुक्यातील आंबे पोहोरगांव येथील वाळूगटाचा रितसर लिलाव झाला असून, लिलावधारकामार्फत वाळूची वाहतुक सुरु आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ता खराब झाल्याचा अहवाल सादर केला आहे. त्यानुसार खनिज विकास निधीमधून रस्ता दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडून सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.

(३) (अ) नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील मांजरा नदीपात्रातील वाळू स्थळावर नियंत्रण ठेवण्यासाठी पथकाची नियुक्ती करण्यात आली असून, सदर पथकाने केलेल्या तपासणीत एप्रिल, २०१५ ते जून २०१५ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या १२८ प्रकरणांत रु.१४,६७,९००/- एवढा दंड वसूल करण्यात येवून १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(ब) पंढरपूर तालुक्यात माहे एप्रिल २०१५ ते जून २०१५ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतूकीच्या २८ प्रकरणांत रु.८,००,२००/- एवढा दंड वसूल करण्यात येऊन ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबई, काळाचौकी येथील विकास फिनले टॉवर यांनी भुमिअभिलेख विभागातील अधिका-यांच्या संगनमताने बेकायदा पुनर्विकासाची योजना राबविल्याबाबत

**(२९) * २२८८६ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, काळाचौकी येथील विकास फिनले टॉवर असलेली जमीन मूळ मालक असलेल्या पारशी ट्रस्टने विकास फिनले मिल्सला भाडेतत्वावर दिल्यानंतर विकास फिनले टॉवर ही इमारत १९८४ साली उभी करुन जिल्हाधिकारी कार्यालयातील

भूमिअभिलेख विभागातील संबंधित अधिका-यांच्या संगनमताने मालमत्ता कार्डावर सोसायटीचे बेकायदा नाव लावून विकासक पुनर्विकासाची योजना राबवित असल्याची बाब एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विकासक व जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) असे निदर्शनास आले नाही.

प्रश्नाधीन परेल-शिवडी येथील जमीन (भूकर क्र.१९०, शीट नं.४२०, ४२१ व ४०२) याच्या मिळकत पत्रिकेत दि फिनले मिल्स लि. यांची भाडेकरु म्हणून नोंद असून तेथे सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावाची नोंद करण्यात आलेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खानवटे (ता.दौंड, जि.पुणे) येथील भीमा नदी पात्रात**
**चोरुन बेसुमार वाळु उपसा होत असल्याबाबत**

**(३०) * १७६११ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानवटे (ता.दौंड, जि.पुणे) येथील भीमा नदी पात्रात भिगवण राशीन पुलाच्या काही अंतरावरुन चोरुन बेसुमार वाळू उपसा केला जात असल्याचे तसेच देहूतील मुख्य देऊळवाडा आणि वैकुठस्थान मंदिराजवळील इंद्रायणी नदीतून गेली काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर उपसा होत असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) राजापूर, खिद्रापूर आणि आलास नदीपात्रात (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) बेसुमार अनधिकृत वाळू उपसा सुरू असल्याचे माहे एप्रिल व मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) प्रकरणी भीमा नदीवरील पूल कोसळण्याची शक्यता असून प्रश्न भाग (२) प्रकरणी राजापूर बंधाऱ्यास धोका निर्माण झाला असून सदर बंधारा वाचवावा आणि अनधिकृतपणे सुरु असलेली वाळू तस्करी बंद करावी, अशी मागणी जिल्हयाचे पालकमंत्री यांच्याकडे दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास तालुक्यातील शिष्टमंडळाने केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने प्रश्न भाग १ ते ३ बाबत संबंधितांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) कोल्हापूर जिल्ह्यात शिरोळ तालुक्यात मौजे. राजापूर खिद्रापूर व आलास येथे अनधिकृत वाळू उपसा होत असल्याच्या काही घटना निदर्शनास आल्या आहेत.

(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(४) (अ) मौजे खानवटे, ता.दौंड जिल्हा पुणे येथील दोन्ही वाळूगटाचे लिलाव झालेले आहेत. मौजे देहू, ता.हवेली येथील मुख्य देऊळवाडा आणि वैकुंठस्थान मंदिराजवळील इंद्रायणी नदीपात्रात बेसॉल्ट खडक असून, वाळू साठा उपलब्ध नसल्यामुळे उपसा होत नाही.

(ब) मौजे राजापूर, मौजे. खिद्रापूर व मौजे आलास, ता.शिरोळ येथील वाळूच्या अनधिकृत उत्खननाबाबत संबंधितांविरुध्द रु.१०,७२,७३५/- एवढ्या रकमेच्या दंडाचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एस.टी. महामंडळाकडून सन २०१०-११ मध्ये मुंबई सेन्ट्रल व परेल येथे तिकीट आरक्षणांच्या दिलेल्या ठेक्यामध्ये झालेला अपहार

**(३१) * १९२०२ श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई सेन्ट्रल येथे एस.टी. महामंडळाकडून सन २०१०-११ मध्ये ३५ दलालांना व परेल आगारात ३१ दलालांना तिकीट आरक्षणांच्या दिलेल्या ठेक्यामध्ये ठेकेदार व महामंडळाच्या अधिका-यांनी केलेल्या गैरव्यवहारा प्रकरणी संबंधितांना ३ वर्ष होवूनही अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) होय.

सदर प्रकरणी अपहार झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर महामंडळाने केलेल्या खातेनिहाय चौकशीमध्ये एकूण १० अधिकारी व ११ राज्य परिवहन कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात आले होते.

वरील १० अधिका-यांपैकी ७ अधिका-यांवरील व ९ राज्य परिवहन कर्मचाऱ्यांवरील खातेनिहाय कारवाई पूर्ण करण्यात आली असून दोषी आढळून आलेल्या ३ अधिका-यांवर तसेच ६ कर्मचा-यांवर वेतनवाढ रोखण्याच्या शिक्षा लादण्यात आल्या आहेत. उर्वरित अधिकारी कर्मचारी यांची खातेनिहाय कारवाई अंतिम टप्प्यात आहे.

तसेच सदर अपहाराशी संबंधीत दलालांवर न्यायालयीन दावा दाखल करण्यात आला असून तर २१ दलालांची अनामत रक्कम रु.१०,५०,०००/- जप्त करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आरटीओ दलालांकडून वर्षाला ८०० कोटी पेक्षा जास्त महसूलाचे नुकसान होत असल्याबाबत

**(३२) * १७०७० श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, नाशिक पट्टयातील प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये दलालांमुळे शासनाचे वर्षाला ८०० ते ९०० कोटीच्या महसूलाचे नुकसान होत असल्याचे तत्कालीन परिवहन आयुक्तांनी शासनाच्या निदर्शनास आणले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी मा.परिवहन मंत्री व राज्यमंत्री यांना दिनांक २८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास पत्र दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती प्रादेशिक परिवहन कार्यालयात दलालांना बंदी घालण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) परिवहन कार्यालयात नागरीकांस दलालाकडे जावे लागू नये म्हणून मार्गदर्शन कक्ष, एक खिडकी योजना, ऑनलाईट अपॉईन्टमेंट, वेबसाईटद्वारे फॉर्म व कार्यपध्दतीची माहिती आणि कार्यालयात लावलेले माहिती फलक यासारख्या विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

तसेच, अर्जदाराने प्राधिकृत केलेली व अधिकारपत्र धारण कारणारी व्यक्ती कार्यालयात असल्यास, त्या व्यक्तीबाबत खातरजमा करुन संबंधित अर्जदाराचा अर्ज अधिकारपत्रधारक व्यक्तींमार्फत स्विकारला जाण्याबाबत मा.उच्च न्यायालाय, नागपूर खंडपीठ यांनी याचिका क्र.४४३/२०१५, ६०१/२०१५ व ८९२/२०१५ मध्ये दि.२५.०३.२०१५ रोजी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरणने रोहीत्रांच्या खरेदी प्रक्रियेत नियमबाह्यपणे दिल्लीच्या ॲक्युरेट ट्रान्सफॉर्मर कंपनीला पुरवठ्याचे काम दिल्याबाबत

**(३३) * २३१६९ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणने रोहीत्रांच्या खरेदी प्रक्रियेत नियमबाह्यपणे दिल्लीच्या ॲक्युरेट ट्रान्सफॉर्मर कंपनीला पुरवठ्याचे काम दिल्यामुळे महावितरण कंपनीला २७७ लाखांचा तोटा सहन करावा लागून रोहित्रांच्या पुरवठ्यासाठी वर्षभर वाट पाहावी लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. रोहित्रांची खरेदी ई-निविदा प्रक्रियेद्वारे पारदर्शकरित्या झाली असून पुरवठादाराने विहित कालावधीमध्ये रोहित्रांचा पुरवठा केल्यामुळे निविदेच्या अटी व शर्तीनुसार सुधारीत दरानुसार रु.२७७ लाख अदा करण्यात आली होती. परंतु २९४७ रोहित्रांमध्ये आढळून आलेल्या त्रुटी ह्या पुरवठादाराने उशिरा दुरुस्त करुन दिल्यामुळे अदा करण्यात आलेली रक्कम रु.२७७ लाख ही मे.अॅक्युरेट ट्रान्सफॉर्मर लि., नवी दिल्ली या कंपनीची महावितरणकडे जमा असलेली बॅक गॅरंटी रु.५१२.८१ लाख चे रोखीकरण करुन ती वसुल करण्यात आलेली आहे. त्यामुळे महावितरण कंपनीला कुठल्याच प्रकारचा तोटा सहन करावा लागला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) यंत्रमागधारकांना सूत गिरणी (लूम) चालविण्यासाठी मिळत असलेल्या सबसिडीत कपात केल्याने यंत्रमागधारकांचे उद्योग बंद होण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(३४) * २०७४५ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) यंत्रमागधारकांना सूत गिरणी (लूम) चालविण्यासाठी मिळत असलेल्या ५० टक्के विद्युत सबसिडी मधून २० टक्के सबसिडी कपात केल्याने यंत्रमागधारकांचे उद्योग बंद होण्याच्या मार्गावर असून सदर सबसिडी त्वरीत सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वित्त व नियोजन मंत्री यांच्याकडे दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच भिवंडी शहर व परिसरात मोठया प्रमाणात कापडाचा व्यवसाय करणारे लाखो यंत्रमाग कामगार व त्यांचे कुंटुंबीय यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार भिवंडी तालुक्यातील यंत्रमागधारकांना सूत गिरणी (लूम) चालविण्यासाठी उर्वरित २० टक्के सबसिडी तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) विद्युत नियामक आयोगाने त्यांचे वीजदर दि.१.०६.२०१५ पासून सुधारीत वीजदर लागू केले आहेत. लघुदाब यंत्रमाग धारकांकरीत नवीन वीज वर्गवारी निर्माण केली आहे. सदर वर्गवारीचे वीज दर औद्योगिक वर्गवारीच्या तुलनेत कमी ठेवण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.